पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

अ प्रभाग समिती

सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक 2 ]

दिनांक : 29 /8/2017 वेळ : सकाळी 11.00 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची विशेष सभा [ मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचे दि. 22/8/2017 रोजीचे पत्रास अनुसरुन ] मंगळवार दिनांक 29/8/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " राजमाता जिजाऊ सभागृह " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. केशव हनुमंत घोळवे | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा. मंगला अशोक कदम | सदस्या |
| 4. | मा. तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 5. | मा. जावेद रमजान शेख | सदस्य |
| 6. | मा. यादव मिनल विशाल | सदस्या |
| 7. | मा. वैशाली जालिंदर काळभोर | सदस्या |
| 8. | मा. प्रमोद कुटे | सदस्य |
| 9. | मा. राजू मिसाळ | सदस्य |
| 10. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / उपमहापौर |
| 11. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| 12. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 13. | मा. जयश्री वसंत गावडे | सदस्या |
| 14. | मा. कोमल दिपक मेवानी | सदस्या |
| 15. | मा. शितल उर्फ विजय गोरख शिंदे | सदस्य |

याशिवाय श्री संजय खाबडे – मा. कार्यकारी अभियंता, विदयुत, श्री विशाल कांबळे - मा. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा , श्रीम.रेखा गाडेकर – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री संजय काशीद, श्री. राजेंद्र इंगळे, श्री. सुभाष काळे, श्री.वैभव पुसाळकर, श्री. कोल्हे एल.पी., श्री अनिल शिंदे, श्री. संजय तुपसाखरे, श्रीम एल.एस. बाबर – उपअभियंता, श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री. पी.एम. गायकवाड - उदयान अधिक्षक [वृक्षसंवर्धन्], श्री पाटील एस.बी., श्री शेख एस.के., श्री. ए.ए.भोसले - कनिष्ठ अभियंता, श्री खुळे जी.एस. उदयान सहाय्यक, श्री अरुण सोनकुसरे – कार्यालय अधिक्षक, श्री.गायकवाड, श्री. पानसे – आरोग्य् निरिक्षक इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांनी उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या तसेच अधिकारी यांचे स्वागत केलेनंतर मा. सभापती यांनी मा. उपमहापौर यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच मा. वैशाली काळभोर यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला अध्यक्षा पदावर निवड झालेबद्दल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करणेत आला. तदनंतर उपस्थित सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, अधिकारी यांचा देखील मा. सभापती यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. .

सन्मा. सदस्यांच्या मागणीनुसार सर्व अधिकारी तसेच सन्मा. सदस्य यांनी स्वत:ची ओळख करुन दिली. त्यानंतर प्रस्तुतची विशेष सभा सुरुवात करणेस अनुमती देण्यात आली.

ठराव क्रमांक 3 विषय क्रमांक 1
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 येथील शाहूनगरमधील कै. सदाशिव बहिरवाडे क्रिडांगण व व्यायामशाळेचे राजर्षी शाहू महाराज क्रिडांगण व व्यायामशाळा असे नामकरण करणेस मान्यता देणे.

विषय क्रमांक 1 चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 4 विषय क्रमांक 2
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 येथील शाहूनगर, संभाजीनगर, एचडीएफसी कॉलनी व परिसरामध्ये पाणीप्रश्न हा अतिशय गंभीर असल्याने तसेच प्रस्तुत विषयास मा. मंगला कदम यांनी उपसूचना दिलेनुसार अ क्षेत्रीय कार्यक्षेत्रामधील सर्व प्रभागामध्ये 24*7 ही महत्वकांक्षी पाणीपुरवठा योजना त्वरीत सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव उपसूचनेसह सर्वानुमते मंजुर झाला.

[ सदर विषयाचे अनुषंगाने कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभागाने जलशुद्धीकरण प्रकल्पाचे ठिकाणी व्हिजीटचे आयोजन करावे. तसेच 24*7 ही योजना सुरु झालेनंतर काय सुविधा मिळतील तसेच ती सुरु करणेअगोदरची परिस्थिती काय होती या संदर्भात लवकरात लवकर सभेचे आयोजन करुन सर्व सन्मा. सदस्यांना संगणकीकृत सादरीकरणाद्वारे माहिती दयावी. ]

ठराव क्रमांक 5 विषय क्रमांक 3
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 येथील शाहूनगर, संभाजीनगर, एचडीएफसी कॉलनी व परिसरातील ड्रेनेज वारंवार तुंबत असल्याने ड्रेनेजचे कामकाज करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 6 विषय क्रमांक 4
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 येथील शाहूनगर, संभाजीनगर, एचडीएफसी कॉलनी व परिसरातील पावसाचे पाणी साठणा-या फुट प्रिंटस् घेऊन स्ट्रॉम वॉटरलाईन टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 7 विषय क्रमांक 5
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 येथील शाहूनगर येथील राजर्षी शाहू उदयानाचे व पिरॅमिड हॉलचे नव्याने नुतनीकरण करणेस व सिमाभिंतीची उंची वाढविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 8 विषय क्रमांक 6
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 येथील शाहूनगरमधील कै. सदाशिव बहिरवाडे क्रिडांगणाची दुरुस्ती करणेस, ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणेस, तेथील शौचालयाचे नुतनीकरण करणेस, प्रेक्षक गॅलरी मोठी करुन दुरुस्ती करणेस, क्रिडांगणातील विदयुत रोषणाईचे एलईडीकरण करणेस तसेच सुशोभित सिमाभिंत बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 9 विषय क्रमांक 7
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 येथील शाहूनगर, संभाजीनगर, एचडीएफसी कॉलनी व परिसरामध्ये आवश्यक तेथे गतिरोधक पेव्हींग ब्लॉक बसवून पदपथाची दुरुस्ती करणे, व आवश्यक तेथे नवीन पदपथ तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 10 विषय क्रमांक 8
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शिवसाहू उदयानाची डागडूजी,दुरुस्ती व सिमाभिंतीची उंची, फिश अक्कारिझम तसेच तेथील खाणीमध्ये डॉल्फीन शो ची निर्मिती करणेस, ज्येष्ठ नागरिकांसाठी ओपन जिम संकल्पनेची निर्मिती करणेस तसेच सन्मा. सदस्या जयश्री गावडे यांनी उपसूचना दिले नुसार अ

क्षेत्रीय कार्यक्षेत्रामधील सर्व प्रभागांमध्ये ज्या ठिकाणी जागा उपलब्ध असेल त्याठिकाणी ओपन जिम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव उपसूचनेसह सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 11 विषय क्रमांक 9
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयामधील गेली अनेक वर्षापासून वापरात न आणलेले व्यापारी गाळे वा तत्सम मिळकती भाडे तत्वावर वापरामध्ये आणून पालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 12 विषय क्रमांक 10
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयामधील सर्व सभागृहामध्ये, सांस्कृतिक भवने यांची तपशीलवार माहिती घेऊन नागरिकांसाठी नि:शुल्क ऐवजी माफक शुल्क निश्चित करुन उपलब्ध करुन देणेस व सर्व सभागृहामध्ये, सांस्कृतिक भवने यांची दुरुस्ती करणेस व निगा ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 13 विषय क्रमांक 11
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयातील मुख्य चौकामध्ये सुशोभिकरण करणेकरीता स्थानिक कंपन्यांना पालकत्व देऊन त्या कंपन्यांचे नावफलक सदर ठिकाणी लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

[प्रस्तुत विषयाचे अनुषंगाने सन्मा. सदस्या मंगला कदम यांनी कोणते चौक सुशोभिकरणाकरीता घेणार आहेत त्याची माहिती स्थापत्य विभागाने दयावी व त्यानंतरच सुशोभिकरण करावे अशी मागणी केली.]

ठराव क्रमांक 14 विषय क्रमांक 12
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयाचे हद्दीतील कंपन्याचे सांडपाणी व गाळसाळ प्रक्रिया इत्यादीची कारखाने कायदा अधिनियमानुसार काटेकोरपणे पालन केले जाते किंवा नाही याबाबतचा अहवाल घेणेस व पालन न करणा-या नोटीसा बजावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 15 विषय क्रमांक 13
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयाचे हद्दीतील सांस्कृतिक भवने, सभागृहे व तत्सम मा. धर्मादाय आयुक्त यांचे नोंदणीकृत असतील व त्याचा वापर सर्वसामान्य नागरीकांना होत नसेल तर ती सर्व सुविधा माफक शुल्कामध्ये उपलब्ध करुन देणेस मंजुरी देणेस व संबंधितांना नोटीसीद्वारे कळविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

[सदर विषयाचे अनुषंगाने सभागृहामध्ये विस्तृतपणे सविस्तर चर्चा होऊन उपस्थित सन्मा. सदस्यांमधील मा. मंगला कदम व इतर काही सदस्यांनी प्रस्तुतचे विषयास विरोध नोंदविला. सन्मा. सदस्य राजू मिसाळ, मा. वैशाली काळभोर यांनी विषय शक्यतो नावानिशी यावेत अशी मागणी/विनंती केली. ]

ठराव क्रमांक 16 विषय क्रमांक 14
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयाचे हद्दीतील जलप्रदूषण कमी करणेसाठी गटर्स व नाला सफाई करुन नागरिकांमध्ये स्वच्छ भारत, सुंदर भारत अभियानाची जनजागृती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 17 विषय क्रमांक 15
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर येथील आरोग्य विभागाच्या सफाई कर्मचा-यांचे थकीत वेतन, किमान वेतन कायदा, भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा कायदा वा तत्सम कायदयांचे तसेच महापालिकेच्या नियम व अटी शर्तीचे पालन न करता संबंधित ठेकेदार राजरोसपणे काम करीत आहेत अशा सर्व ठेकेदारांवर कारवाई करुन त्यांना काळया यादीमध्ये टाकणेस तसेच कामगारांची सर्व थकीत देणी वसुल करणेस व संबंधित ठेकेदारावर फौजदारी गुन्हे दाखल करणेस व नवीन ठेकेदाराची नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

[ सदर विषयाचे अनुषंगाने सभागृहामध्ये विस्तृतपणे सविस्तर चर्चा झाली. उपस्थित सन्मा. सदस्या मा. मंगला कदम यांनी प्रस्तुतचे विषयास विरोध नोंदविला. तसेच अ क्षेत्रीय कार्यालयामधील इतर प्रभागांकरीता देखील वरील प्रमाणे ठराव करुन कारवाई करणेची मागणी केली. तथापि, सन्मा. सदस्या जयश्री गावडे यांनी प्रभाग क्रमांक 19 त्यामधून वगळण्याची तसेच संबंधित ठेकेदारांना एक वेळ संधी देण्याची मागणी केली.]

ठराव क्रमांक 18 विषय क्रमांक 16
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयाचे हद्दीतील मुख्य चौक, रस्ते येथे लेझर होर्डीग्जसाठी मान्यता देऊन पिंपरी चिंचवड महापालिकेचे उत्पन्नामध्ये वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 19 विषय क्रमांक 17
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ प्रभागामधील वाढत्या रहदारीच्या समस्येमुळे दिवसें-दिवस नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. अनेक ठिकाणी जवळचे मार्ग असताना ते वाहतुकीसाठी खुले झालेले नाहीत. तरी असे अ प्रभागातील सर्व रस्ते खुले करणेसाठीची सर्व कामे, परवाने मंजुर करुन अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

[मा. जयश्री गावडे, सन्मा. सदस्या यांनी सदर ठरावाचे अनुषंगाने लोकमान्य जवळील दळवीनगर येथे वळण रस्ता छोटा असल्याने तो वळण रस्ता मोठा करण्याची मागणी केली. ]

ठराव क्रमांक 20 विषय क्रमांक 18
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10, 14, 15, 19 मिळून अ प्रभाग झालेला असून भौगोलिक , लोकसंख्या, क्षेत्रफळदृष्टया खुप मोठा झालेला असल्याने येथील कामांना गतीमान करणेसाठी खर्च मर्यादा 10 लाखाऐवजी 25 लाखपर्यंत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 21 विषय क्रमांक 19
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर, संभाजीनगर, एचडीएफसी कॉलनी, मोरवाडी, म्हाडा कॉलनी, अमृतेश्वर कॉलनी, एम.आय.डी.सी. कॉलनी, पोलीस वसाहत येथील सोसायटयांसमोर बेंचेस बसविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 22 विषय क्रमांक 20
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील लालटोपीनगर, आण्णासाहेब नगर, इंदिरानगर, विदयानगर, दत्तनगर, शंकरनगर येथील गटारे, नाले, पदपथ, शौचालये, पिण्याच्या पाण्याच्या पाईपलाईन्स, दिवाबत्ती अनुक्रमे सफाई करणेस, सिमेंट कॉंक्रीटीकरण करणेस, बांधकाम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 23 विषय क्रमांक 21
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ प्रभागामधील महानगरपालिकेच्या सर्व शाळांची व शौचालयांची देखभाल , दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 24 विषय क्रमांक 22
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ प्रभागामधील महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांची देखभाल दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 25 विषय क्रमांक 23
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ प्रभाग हद्दीमध्ये डेंगू, स्वाईन् फ्लू मुक्त करण्यासाठी नियमित औषध फवारणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 26 विषय क्रमांक 24
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे
संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ प्रभागामधील मुख्य व अंतर्गत रस्त्यांची व खड्डयांची डागडूजी व दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 27 विषय क्रमांक 25
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे
संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील अटोक्लस्टर जवळील सर्वधर्मीय् स्मशानभूमीमध्ये विदयुत दाहीनी बसविणेस व स्मशानभूमीचे नुतनीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 28 विषय क्रमांक 26
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे
संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ प्रभाग हद्दीमधील वहातुकीस अडथळा करणारी अतिक्रमणे, पदपथावरील अतिक्रमणे काढणेस करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

[सदर विषयाचे अनुषंगाने प्रशासन अधिकारी तथा सचिव , सभाशाखा यांनी अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत अतिक्रमण कारवाईकरीता पथकाकडे वाहनचालक, कर्मचारी नाहीत, पोलीस बंदोबस्त वेळेवर मिळत नसल्याचे सभागृहाचे निदर्शनास आणून दिले. ]

ठराव क्रमांक 29 विषय क्रमांक 27
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे
संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर येथे दोन्ही बाजूस दोन सुभोभित कमानी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

[प्रस्तुत विषयाचे अनुषंगाने सन्मा. सदस्या जयश्री गावडे यांनी प्रभाग क्रमांक 19 मध्ये , मा. मिनल यादव यांनी प्रभाग क्रमांक 14 मध्ये कमान करणेची मागणी केली. ]

ठराव क्रमांक 30 विषय क्रमांक 28
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मध्ये महिलांच्या व मुलींच्या सुरक्षिततेसाठी तसेच रोडरोमियो आणि चो-यांचे प्रमाण रोखण्यासाठी पोलीस गस्त पथकाची नेमणूक करणेस व सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 31 विषय क्रमांक 29

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील बर्ड व्हॅलीचे पदपथ, सीसी टीव्ही, बोटींग, देखभाल व दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 32 विषय क्रमांक 30

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. अनुराधा गोरखे अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सभापती, केशव हनुमंत घोळवे यांचा दि. 22/8/2017 चा प्रस्ताव

अ प्रभाग हद्दीची पाहणी करुन आवश्यक त्या ठिकाणी सार्वजनिक शौचालये बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 33 विषय क्रमांक 31

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा.अनुराधा गोरखे अनुमोदकः मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव

अ प्रभाग 10 मधील दत्तनगर, विदयानगर, परशूरामनगर, अण्णासाहेब मगर नगर, लालटोपीनगर, म्हाडा, मोरवाडी येथील संपुर्ण भागात महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधणेस तसेच तेथील ड्रेनेज लाईन भूमिगत करणेस, विदयुत खांब, विदयुत केबल्स, पाणीपुरवठा पाईप लाईन्स 20 वर्षापासून तीच असल्याने कुजलेली आहेत त्यासाठी सर्व पाईपलाईन बदलणेस, पाण्याकरीता स्वतःचे मीटर बसविणेस , एलईडी दिवे बसविणेस तसेच सन्मा. सदस्या जयश्री गावडे यांनी अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील सर्व प्रभागांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र शौचालये बांधणेकामी दिलेल्या उपसुचनेसह मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 34 विषय क्रमांक 32

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक :मा. अनुराधा गोरखे अनुमोदकः मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील झोपडपट्टयांमध्ये स्वच्छता मोहिमेअंतर्गत आरोग्य विभागामार्फत् स्वच्छता करणेस तसेच संडास, गटारे, नाले दररोज साफ करणेस, कचराकुंडया रोज उचलणेस, रस्ते रोज साफ करणेस, औष्णीक धुरीकरण दररोज करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 35 विषय क्रमांक 33
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :मा. अनुराधा गोरखे अनुमोदक: मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील दत्तनगरमध्ये पालिकेचा दवाखाना आहे. वरच्या मजल्यावर सदरचा दवाखाना असल्यामुळे येणा-या रुग्णामधील गरोदर माता, ज्येष्ठ नागरीक, अपंग नागरीक यांना जिना लहान असल्याने त्रास होतो तरी दवाखान्याच्या खालील हॉलमध्ये दवाखान्याचे स्थलांतर करणेस, सेक्युरिटी गार्ड ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 36 विषय क्रमांक 34
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :मा. अनुराधा गोरखे अनुमोदक: मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मध्ये दत्तनगर, इंदिरानगर, विदयानगर याठिकाणी जे आरोग्य ऑफिस आहे ते पत्राशेडचे असल्याने बांधणेस तसेच तेथील कर्मचा-यांकरीता स्वच्छतागृहाची व्यवस्था करणेस , महिला कर्मचा-यांना युनिफॉर्म बदलणेकरीता खोली तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 37 विषय क्रमांक 35
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :मा. अनुराधा गोरखे अनुमोदक: मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 येथे विदयानगरमध्ये ऑईल गाळून विकले जाते व उरलेला गाळ खादानीत टाकला जातो त्यामुळे शेजारील झोपडयामध्ये प्रदूषण होऊन आग लागणेची शक्यता असल्याने ऑईल गाळून विकणेस बंदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

[प्रस्तुत विषयाचे अनुषंगाने सन्मा. सदस्या मंगला कदम यांनी खंडोबामाळ येथे देखील यामुळे घसरडे झाले असल्याने सदरचा परिसर हा देखील सदर ठरावामध्ये समाविष्ट करणेची मागणी केली. ]

ठराव क्रमांक 38 विषय क्रमांक 36
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक :मा. अनुराधा गोरखे अनुमोदक: मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील बर्ड व्हॅलीसमोरील निगडी-भोसरी रोडवर पदपथ तयार करणेस, बर्ड व्हॅलीसमोरील चौकात सिग्नल, गतीरोधक बसविणेस, फूटपाथ व्यवसाय करणा-यांचा बंदोबस्त करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 39 विषय क्रमांक 37

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक :मा. अनुराधा गोरखे अनुमोदक: मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील दत्तनगर, शंकरनगर, इंदिरानगर, विदयानगर येथील झोपडपटटीमध्ये दारु विक्री होते. त्याचा त्रास महिला व मुलींना होतो त्याकरीता बंदोबस्त करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 40 विषय क्रमांक 38

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक :मा. अनुराधा गोरखे अनुमोदक: मा. तुषार हिंगे

संदर्भ :- सन्मा. सदस्या अनुराधा गोरखे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 म्हाडा परिसरात पाण्याची टाकी बांधणेस, व अण्णासाहेब मगर झोपडपट्टीचे पुर्नवसन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

[सन्मा. सदस्या मंगला कदम यांनी नागरीकांच्या सहमतीने मंजुर करावा अन्यथा त्यांचा भाग वगळणेची मागणी केली. ]

ठराव क्रमांक 41 विषय क्रमांक 39

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. प्रमोद कुटे अनुमोदक: मा. मिनल यादव

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील दत्तवाडी अंतर्गत भागातील मारुती कॉमप्लेक्स् जवळील रस्त्याचे ह.भ.प. कै. दगडू उर्फ दादा पवार असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 42 विषय क्रमांक 40

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. प्रमोद कुटे अनुमोदक: मा. मिनल यादव

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील महापालिका शौचालयांची डागडुजी/ दुरुस्ती व साफसफाई करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 43 विषय क्रमांक 41
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. प्रमोद कुटे अनुमोदकः मा. मिनल यादव

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मध्ये डेंगू, मलेरिया, स्वाईन फ्लयू वर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळोवेळी औषध फवारणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 44 विषय क्रमांक 42
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. प्रमोद कुटे अनुमोदकः मा. मिनल यादव

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयामध्ये महिन्यातून एकदा [ दुस-या मंगळवारी ] मा. प्रभाग समितीची मासिक सभा घेण्याचे निश्चित झाले आहे. त्यामुळे महिन्यातून दोन वेळा विशेष सभेचे आयोजन करणे शक्य नाही. तथापि, सन्मा. सदस्यांची मागणी असल्यास सभापती यांचे मान्यतेने विशेष सभा घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 45 विषय क्रमांक 43
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. प्रमोद कुटे अनुमोदकः मा. मिनल यादव

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 येथील निगडी चौक ते सावली हॉटेलपर्यंत पदपथावर असणारे खादय पदार्थ विक्रेत्यांकरीता संत तुकाराम व्यापार संकुलनचे वाहनतळामध्ये खाऊगल्ली तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 46 विषय क्रमांक 44
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. प्रमोद कुटे अनुमोदकः मा. मिनल यादव

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील संत तुकाराम व्यापार संकुलामध्ये असलेल्या अस्तित्व् मॉलमध्ये अभ्यासिका व वाचनालय तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 47 विषय क्रमांक 45
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. प्रमोद कुटे अनुमोदकः मा. मिनल यादव

संदर्भ :- सन्मा. सदस्य प्रमोद कुटे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील खंडोबामाळ चौक् येथे असणा-या Masscorp या खाजगी कंपनीचे सुशोभिकरणाचा करार संपत आल्याने त्याठिकाणी महापालिकेच्या वतीने भव्य दिपमाळ उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

[प्रस्तुत विषयास सन्मा. सदस्या मंगला कदम यांनी त्यांचा विरोध नोंदविला. ]

ठराव क्रमांक 48 विषय क्रमांक 46

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. शर्मिला बाबर अनुमोदक : मा. शैलजा मोरे

संदर्भ :- सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 व 15 मध्ये तसेच सन्मा. सदस्या जयश्री गावडे यांनी उपसुचना दिल्यानुसार अ क्षेत्रीय मधील सर्व प्रभागांमधील मोकाट जनावरे व मोकाट कुत्र्यांची संख्या खूप झाली आहे. तरी पशूवैदयकीय मार्फत सदरची मोकाट जनावरे व मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणेस / पकडून नेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 49 विषय क्रमांक 47

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. शर्मिला बाबर अनुमोदक : मा. शैलजा मोरे

संदर्भ :- सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 मध्ये झाडांची संख्या मोठया प्रमाणात आहे छाटणी लवकर होत नाही त्याकरीता आवश्यक असलेली यंत्रणा कमी आहे [ गाडी व लेबर ] त्याकरीता आवश्यक ती उपाय योजना करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 50 विषय क्रमांक 48

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. शर्मिला बाबर अनुमोदक : मा. शैलजा मोरे

संदर्भ :- सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 मध्ये औषध फवारणी करणा-या गाडयांची संख्या कमी आहे. औषध फवारणी दररोज होणे गरजेचे त्याकरीता गाडयांची संख्या वाढविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 51 विषय क्रमांक 49

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. शर्मिला बाबर अनुमोदक : मा. शैलजा मोरे

संदर्भ :- सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 मधील आकुर्डी गावठाण व पंचतारानगरमध्ये स्वच्छतागृह दुरुस्त करणेस स्वच्छ ठेवणेस मान्यता देणे व महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 52 विषय क्रमांक 50
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. शर्मिला बाबर अनुमोदक : मा. शैलजा मोरे
संदर्भ :- सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 मध्ये उदयानांची संख्या मोठी आहे परंतु त्याठिकाणी रखवालदार नाही उदयान देखभाल काम कोणाकडे आहे याची माहिती नगरसदस्यांना नाही, ती मिळणेस व प्रत्यक्ष उदयानांची माहिती मिळणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 53 विषय क्रमांक 51
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. शर्मिला बाबर अनुमोदक : मा. शैलजा मोरे
संदर्भ :- सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 पांढरकर वस्तीमध्ये सोबत जोडलेल्या पुर्वीच्या ठरावानुसार नामकरण करणेची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 54 विषय क्रमांक 52
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. शर्मिला बाबर अनुमोदक : मा. शैलजा मोरे
संदर्भ :- सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 मध्ये तसेच सन्मा. सदस्या जयश्री गावडे यांनी उपसूचना दिलेनुसार अ क्षेत्रीय सर्व प्रभागांमध्ये घनकचरा उचलणेकरीता असलेल्या गाडयांची संख्या खूप कमी आहे तरी गाडयांची संख्या वाढविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 55 विषय क्रमांक 53
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. तुषार हिंगे अनुमोदक : मा. अनुराधा गोरखे
संदर्भ :- सन्मा. सदस्य तुषार हिंगे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगर जवळील केएसबी चौकामधील ग्रेड सेपरेटरला दोन्ही बाजूला माजी उपसभापती [ शिक्षणमंडळ, पिंपरी चिंचवड महानगरपालिका ] कै. कैलासभाऊ चांदगुडे असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 56 विषय क्रमांक 54
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. तुषार हिंगे अनुमोदक : मा. अनुराधा गोरखे
संदर्भ :- सन्मा. सदस्य तुषार हिंगे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील शाहूनगरमध्ये पाणीपुरवठयासाठी 24*7 प्रमाणे पाण्याचे नियोजन करणेस व ते करीत असताना एमआयडीसी व पीसीएमसी या दोन्हींच्या लाईन्स जेथे आहेत तिथे नियोजन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 57 विषय क्रमांक 55
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. तुषार हिंगे अनुमोदक : मा. अनुराधा गोरखे

संदर्भ :- सन्मा. सदस्य तुषार हिंगे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील सम्राट चौकामध्ये एमएसईबीचे खांब आहेत ते शिफ्ट करुन सम्राट चौक सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 58 विषय क्रमांक 56
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. तुषार हिंगे अनुमोदक : मा. अनुराधा गोरखे

संदर्भ :- सन्मा. सदस्य तुषार हिंगे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील चिंचवड स्टेशन येथील महावीर चौकातील साईप्रसाद कंपनीला दिलेला चौक त्यांचेकडून काढून नवीन नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 59 विषय क्रमांक 57
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. तुषार हिंगे अनुमोदक : मा. अनुराधा गोरखे

संदर्भ :- सन्मा. सदस्य तुषार हिंगे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील लालटोपीनगर येथे असलेल्या नाटयगृहाचे आरक्षणाचे ठिकाणी समाज मंदीराची बांधणी करुन तेथे अभ्यासिका करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 60 विषय क्रमांक 58
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. तुषार हिंगे अनुमोदक : मा. अनुराधा गोरखे

संदर्भ :- सन्मा. सदस्य तुषार हिंगे यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील कचरा प्रभागातच जिरवणेकरीता नियोजन करणेस मान्यता देणे

सदरचा ठराव मंजुर करणेत येत आहे.

ठराव क्रमांक 61 विषय क्रमांक 59
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. मिनल यादव अनुमोदक : मा. प्रमोद कुटे

संदर्भ :- सन्मा. सदस्या मिनल यादव यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील मोहननगर परिसरामध्ये सिधाजी आप्पा चौक सर्व्हे नंबर 126/2 शिवदर्शन् कॉलनी व चिंचवड स्टेशन प्रेस्टीज येथे ब्लॉकची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 62 विषय क्रमांक 60

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. मिनल यादव अनुमोदक : मा. प्रमोद कुटे

संदर्भ :- सन्मा. सदस्या मिनल यादव यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील अनुसया बाबर उदयानामध्ये खेळणी बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 63 विषय क्रमांक 61

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. मिनल यादव अनुमोदक : मा. प्रमोद कुटे

संदर्भ :- सन्मा. सदस्या मिनल यादव यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील काळभोरनगर परिसरामध्ये विदयुतचे खांब बसविणेस तसेच एलईडी विदयुत दिवे बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 64 विषय क्रमांक 62

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. मिनल यादव अनुमोदक : मा. प्रमोद कुटे

संदर्भ :- सन्मा. सदस्या मिनल यादव यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील काळभोरनगर परिसरामध्ये 10-12 बेंचेस बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 65 विषय क्रमांक 63

दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक : मा. मिनल यादव अनुमोदक : मा. प्रमोद कुटे

संदर्भ :- सन्मा. सदस्या मिनल यादव यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 14 मधील रामनगर परिसरामध्ये नाल्यामध्ये 5-6 पाईप टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 66 विषय क्रमांक 64
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा.जयश्री गावडे अनुमोदक : मा. विजय शिंदे

संदर्भ :- सन्मा सदस्य शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे यांचा दि. 26/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 19 मधील डुकरे आणि कुत्री यांचा बंदोबस्त करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 67 विषय क्रमांक 65
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा.जयश्री गावडे अनुमोदक : मा. विजय शिंदे

संदर्भ :- सन्मा सदस्य शैलेश उर्फ शैलेंद्र मोरे यांचा दि. 26/8/2017 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 19 मधील आरोग्य विषयक सर्व अडचणी / समस्या दूर करणेस, रस्ते सुस्थितीमध्ये ठेवणेस व खड्डे बुजविणेस मान्यता देणे, आनंदनगरमध्ये नवीन नळ कनेक्शन देणेस मान्यता देणे. आनंदनगर पाणी, आरोग्य, ड्रेनेज, शौचालय व्यवस्था व्यवस्थित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 68 विषय क्रमांक 66
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. शैलजा मोरे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. शैलेजा मोरे, उपमहापौर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 मधील रेल्वेलगतच्या स्वप्नपुर्ती सोसायटीपासून ते दळवीनगर उड्डानपुलापर्यंत रेल्वेच्या बाजूने सुशोभित सिमाभिंत बांधणेस, रंगरंगोटी करणेस, पदपथ तयार करणेस, ज्येष्ठ नागरीकांसाठी बेंचेस बसविणेस, लॉन लावून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

ठराव क्रमांक 69 विषय क्रमांक 67
दिनांक 29/8/2017 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक : मा. शैलजा मोरे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा. शैलेजा मोरे, उपमहापौर यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 मधील प्राधिकरण येथील हेडगेवार भवन मध्ये बहुउद्देशीय व्यापार संकुल बांधणेस तसेच हेडगेवार भवन मधील एलबीटीचे कार्यालय स्थलांतरीत करुन त्याठिकाणी स्पर्धा परीक्षा व तत्सम परीक्षेसाठी अदयावत अभ्यासिका करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती केशव हनुमंत घोळवे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[केशव हनुमंत घोळवे]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/11/कावि/1224/2017
दिनांक 7/9/2017

प्रशासन अधिकारी
तथा सचिव
सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित